सामंजस्य करारामुळे शिक्षण उद्योगव्यवस्थेशी जोडले जाणार

संचालक भूषण सावईकर : लघू उद्योग भारती आणि आंबिये महाविद्यालयात सांमजस्य करार

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. १० : उच्च शिक्षण संचालनालय रोजगारक्षमता आणि व्यावहारिक शिक्षण यावर भर देत असून त्याचाच एक भाग म्हणून उद्योगाशी निगडित उपक्रमांना शिक्षणाशी जोडले जात आहे. नव्या शैक्षणिक धोरणात कौशल्यांधारित शिक्षणाला महत्त्व आहे. लघु उद्योग भारती गोवा आणि आंबिये महाविद्यालय यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे शिक्षण उद्योग व्यवस्थेशी जोडले जाईल, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी केले. पर्वरी येथील उच्च शिक्षण संचालनालयात उद्योगभारती आणि संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी संचालक भूषण सावईकर बोलत होते.

यावेळी संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयाचे प्राचार्य जुवांव कोस्टा, लघु उद्योग भारती–गोवाच्या राज्याध्यक्षा पल्लवी साळगावकर, उपाध्यक्ष जयेश रायकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी संत सोहिरोबानाथ आंबिये आणि लघु उद्योग भारती गोवा यांच्यात सांमजस्य करार दि. १० एप्रिल रोजी पर्वरी येथील उच्च शिक्षण संचालनालयात करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, नवोपक्रम आणि उद्योगातील अनुभवांना प्रोत्साहन देणे हा या करारापाठीमागचा उद्देश होता.

पर्वरी : संचालक भूषण सावईकर, प्राचार्य जुवांव कोस्टा, राज्याध्यक्षा पल्लवी साळगावकर, उपाध्यक्ष जयेश रायकर व इतर मान्यवर.

बीबीए अभ्यासक्रमासाठी होणार कराराचा फायदा

आंबिये महाविद्यालयात नव्याने सुरू झालेल्या बीबीए अभ्यासक्रमासाठी या कराराचा फायदा होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार इंटर्नशिप हा बीबीए अभ्यासक्रमाचा एक अनिवार्य घटक आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि उद्योग तज्ज्ञांकडून अतिथी व्याख्याने, उद्योग जगतातील प्रत्यक्ष अनुभव याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी लाभदायक

औद्योगिक भेटी, उद्योगक्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिप, सहयोगी संशोधन, नाविन्यपूर्ण उपक्रम, कॅम्पस प्लेसमेंट, जॉब फेअर्स (नोकरी मेळा) ग्राहक प्रदर्शन आदींबाबत प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी हा सामंजस्य करार लाभदायक ठरणार आहे.

कुडतरीत १६ पासून 'भागवत सप्ताह'

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१०: श्री श्रीपाद श्रीवल्लभ देवस्थान कुडतरीतर्फे श्री भागवताचार्य भाऊ महाराज निटुरकर हैदराबाद यांच्या पूज्य उपस्थितीत अखंड 'भागवत सप्ताह' संपन्न होणार आहे. बुधवार, दि.१६ एप्रिलला सकाळी यजमानास प्रायश्चित देऊन देवता स्थापन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सविस्तर माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश फडते, सचिव किरण वेरेकर, संयुक्त सचिव दिपक सावंत, संयुक्त खजिनदार उद्देश परब, ट्रस्टी संजीत देसाई, बाबू कुडाळकर व बाबू पारकर हे पदाधिकारी उपस्थित होते. संध्याकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत ग्रंथ दिंडी असणार आहे. दि. १७ ते बुधवार २३ रोजी सकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत संहिता वाचन, दुपारी आरती व महाप्रसाद असणार आहे. हे सर्व कार्यक्रम श्रीपाद श्रीवल्लभ देवस्थान सभागृहात होणार आहेत. त्याचप्रमाणे १७ ते २३ एप्रिलपर्यंत दशमस्कंध स्वाहाकार होणार आहे व रोज संध्याकाळी ५ ते ८ पर्यंत भागवत निरुपण होणार आहे. त्यानंतर रात्री महाप्रसाद असणार आहे. पाजीफोंड– मडगाव येथील एन. डी. नायक सभागृहात कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींचे दर्शन घ्यावे, असे आवाहन श्रीपाद श्रीवल्लभ देवस्थान समितीने केले आहे.

खारेबांद येथील इमारतीला आग

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : खारेबांद, मडगाव येथील दाऊद इमारतीला बुधवारी दुपारनंतर आग लागली. आग एवढी भयानक होती की आगीचे लोट व धूर आकाशाकडे झेप घेऊ लागला. परिसर धूर व आगीच्या लोटांनी भरून गेला. त्यातच इमारतीकडे पोहोचण्यास पुरेसा रस्ता ही नसल्याने अग्निशामक दलाला घटनास्थळी पोहोचण्यास व आग विझवण्यास बरेच अडथळे निर्माण झाले. आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे बरेच प्रयत्न सुरू होते. आग नेमकी कशी लागली व त्यात किती नुकसान झाले

पान १ वरून

खा. विरियातोंचे हाउजीला समर्थन

कुटुंब किंवा समाजाचे आर्थिक नुकसान झाले आहे का, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यावे. जर सरकारला खरोखरच सामाजिक दुष्कृत्यांविरोधात कारवाई करायची असेल, तर गोव्यात बेकायदेशीर पद्धतीने चालणाऱ्या कॅसिनोंवर कारवाई करण्यास प्राधान्य दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. छोट्या–मोठ्या हाउजी खेळांना बेकायदेशीर ठरवण्यामागे मोठ्या जुगार व्यवसायातील प्रभावशाली व्यक्तींचा हात आहे का, याची चौकशी होण्याची गरज असल्याचे फर्नांडिस यांनी नमूद केले. सरकारने या खेळांवर जीएसटी आणि टीडीएस लावल्याने, त्याच्या कायदेशीरतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असेही त्यांनी सांगितले. फर्नांडिस यांनी सरकारच्या अनधिकृत घरे नियमित करण्याच्या निर्णयावरही टीका केली. हा निर्णय दीर्घकाळापासून आपल्या घरी राहणाऱ्या स्थानिकांना मदत करण्याऐवजी राजकीय फायद्यासाठी घेतला गेला आहे का, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. काही लोक गेल्या शंभर वर्षांपासून त्याच ठिकाणी राहत असूनही, त्यांना मालकी हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

जर सरकारने हे पाऊल फक्त राजकीय हितसंबंध जपण्यासाठी उचलले असेल, तर हा निर्णय कोमुनिदाद जमिनी आणि प्रतिबंधित क्षेत्रांवर बेकायदेशीरपणे उभ्या राहिलेल्या मालमत्तांचे संरक्षण करणारा ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला.

हाउजी खेळावर घालण्यात आलेल्या बंदीविरोधात स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. जीएसटी आणि टीडीएस लावून या खेळावर सरकारने अन्यायकारक निर्बंध आणल्याची भावना व्यक्त होत आहे. फर्नांडिस यांच्या या भूमिकेमुळे या मुद्द्यावर जनतेतून मोठा प्रतिसाद उमटण्याची शक्यता आहे.

नारळ टंचाई जाहीर करण्याची मागणी

आहे. आतापर्यंत आम्ही ८६६ टन काजू खरेदी केली असून, गेल्या वर्षी ही संख्या केवळ ५५६ टन होती. आम्हाला विश्वास आहे की येत्या काही दिवसांत आम्ही गतवर्षीचे लक्ष्य ओलांडू.

संस्थेच्या १० खरेदी केंद्रांपैकी ९ केंद्रांमध्ये काजू खरेदी मोठ्या प्रमाणात झाली आहे, तर वाळपई केंद्रात तुलनेने कमी व्यवहार झाल्याचे त्यांनी नमूद केले. गोव्यातील कृषी क्षेत्रासाठी हा काळ निर्णायक ठरणार आहे. सरकारने त्वरित पावले उचलली तरच नारळ टंचाईवर मात करून शेतकरी आणि ग्राहकांचे हित जपता येईल, असे जाणकारांचे मत आहे.

२६/११ च्या हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण

तैयबासाठी अधिक सक्रियपणे काम करत असल्याचे उघड झाले. २००५ मध्ये मुंबई आणि कोपनहेगन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची योजना एलईटीनेच रचली होती. हे दोघांच्याही कोर्टातील जबाबावरून स्पष्ट झाले. या दोन्ही योजनांमध्ये राणाही सहभागी होता. मुंबई हल्ल्यातील राणाची भूमिका हेडली आणि एलईटीला हल्ल्यात मदत करण्यापुरती मर्यादित होती. पण डेन्मार्कच्या बाबतीत दोघांनी स्वतः हल्ल्याची योजना आखली होती आणि ते अंमलात आणण्यासाठी डेन्मार्कला रवाना होणार होते. मात्र, त्याआधीच दोघेही शिकागो विमानतळावर पकडले गेले.

२००२ ते २००५ दरम्यान पाकिस्तानमधील एलईटीच्या प्रशिक्षण शिबिरांमध्ये पाच वेगवेगळ्या प्रसंगी सहभागी झाल्याची कबुलीही हेडलीने दिली. २००५ च्या उत्तरार्धात हेडलीला एलईटी सदस्यांवर पाळत ठेवण्यासाठी भारतात येण्याच्या सूचना मिळाल्या. पुढील तीन वर्षांत हेडलीने पाच वेळा भारताला भेट दिली. अमेरिकेच्या शिकागो शहरात ॲटर्नी जनरलने जारी केलेल्या निवेदनानुसार, २००६ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीस हेडली आणि एलईटीच्या दोन सदस्यांनी त्यांच्या कारवायांसाठी मुंबईत इमिग्रेशन कार्यालय उघडण्यावर चर्चा केली. हेडलीने साक्ष दिली की, भारतात कुठे कुठे हल्ला करता येईल, याची राणाशी सल्लामसलत करून चाचपणी केली.

GOVERNMENT OF GOA
OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,
At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.

ABN Case No.:-
ARCS/VPK/PORVORIM/2023/ABN/2078

VPK Urban Co-operative Credit Society Ltd. Porvorim Branch, Porvorim - Goa. .....Disputant

V/s

1. Mr.Francis Xavier Dias: H. No. 5, Chandel Pernem Goa. 2. Mr. Santosh Jagannath Sawant :C/o Mr. Francis Xavier Dias H.no 5, Chandel Pernem Goa. 3. Mr. Rama Gajanan Gadekar : H. No. 336/B, Guirim Bardez Goa.

Legal heirs

a) Mrs.Reema Rama Gadekar, H.No.336/B, Guirim Bardez Goa. ....Opponents

(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)

To,
The Opponent No. 2

WHERAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of **Rs. 831783.30** (Rupees Eight Lakh Thirty One Thousand Seven Hundred Eighty Three and paise Thirty Only) as on 31.12.2022 with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks "**Party Left/Addressee Left** returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 10.04.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on **07.05.2025 at 10.30 a.m.** and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 10th day of April 2025.

SEAL Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
Place: Ponda ABN/EXE North Goa District Curti
Date: 08.04.2025 Ponda- Goa.

IN THE COURT OF INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS, PERNEM, GOA

File No. ISLR / DEM / PER / QUE / 34 / 24 / 452

1. Mrs. Rekha Anil Harji, R/o GPD 5-4, Government Quarters, Opp Saldanha Colony, Penha De France, Bardez, Goa 403521 .....Applicant

V/s

1. Mr. Branca Alvares 2. Aida Carmo Vaz 3. Olga Carmo Vaz Goiret 4. Mr. Vishnu Nagesh Kanoji 5. Mr. Krishna Babu Kanoji 6. Mr. Vishnu Nagesh Kanoji 7. Mr. Prakash Tukaram Redkar 8. Mrs. Priti Prakash Redkar 9. Mr. Jaiwant Laxman Kanoji 10. Mr. Savalo Raghunath Redkar 11. Mr. Mingule Pereira 12. Mr. Ragunath Bhiva Redkar 13. Chandrakala Radhakrishna Talkar 14. Mr. Mahadev Trimbak Talkar 15. Mr. Trimbak Darshan Talkar 16. Mr. Shrawan Dasharath Talkar 17. Mr. Anand Dasharath Talkar 18. Vrajesh Anandrao Kerkar 19. Sahadev Savlo alias Savlaram Redkar 20. Michael Anthony William Garrat 21. Amelia Milagrina Miranda 22. Raman Radhakrishna Talkar 23. Runali Raman Talkar 24. Baban Radhakrishna Talkar 25. Bindiya Baban Talkar 26. Vishwas Radhakrishna Talkar 27. Vishakha Vishwas Talkar 28. Angel Alis Mascarin 29. Tukaram Nana Redkar 30. Raghunath Bhiva Redkar 31. Tukaram Mahadev Gawandi 32. Savlo Raghunath Redkar, All R/o. Talwada, Querim, Pernem, North Goa 403524 .....Opponents

PUBLIC NOTICE

WHEREAS, the above named applicant has filed an application dated 14.06.2024 before this Court under section 114 of Land revenue Code 1968 for Demarcation of property surveyed under Survey No. **114/1-I** of **Querim** of Pernem Taluka.

AND WHEREAS, the applicant Mrs Rekha Anil Harji, vide application dated 01/10/2024 submitted that the notices sent through Reg. AD to the respondents No. 1, 2, 3, 10, 11, 12, 13, 14, 20, 21, 30, and 32 are returned back with the endorsement on the envelopes "Not Known /Person Expired /Unclaimed". The applicant states that he is unaware about present addresses of the unserved respondent/their legal heirs and hence prayed for substitute service of notice by serving notice through publication in the local daily Newspaper.

AND WHEREAS, I am fully satisfied that this is a fit case for such a publication.

Now therefore, the adjoining holder/ interested party in above demarcation case, notice is hereby given that demarcation of above said property is fixed on **23/04/2025 @ 10.30 a.m.** onwards and you are directed to remain present at the site on the above mentioned date, failing which demarcation will be carried out in your absence. The applicant shall remain present at the office of Inspector of Survey and Land Records, Pernem at 9.30 a.m failing which the case will be rejected/ dismissed.

Further, notice is given that said matter is scheduled for hearing on **28/04/2025 @ 11:30 a.m.** at which date and time you are directed to remain present in the Court of Inspector of Survey and land Records Pernem Goa, to file your say failing which matter will be disposed in your absence.

Given under my hand and seal of office on this 8th day of April 2025.

Sd/- **Vinita V. Kambli**
Inspector of Survey & Land Records
Pernem, Goa
Seal

'करिअर कंपास'मधून विद्यार्थी सक्षम बनणार

मुख्यमंत्री प्रमोद सावंत : डॉ. महादेव गावस यांच्या संकलित ग्रंथाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. १० : गोवा राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या 'करिअर कंपास : अ हँडबुक फॉर करिअर, स्कॉलरशिप्स अँड कॉम्पिटेटिव्ह एक्झाम' या ग्रंथामुळे विद्यार्थी सक्षम बनतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेताना मदत करण्यासाठी 'करिअर कंपास' हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी पर्वरी येथील सचिवालयात केले.

उच्च शिक्षण संचालनालयातील समर्थ ई गव्हर्नन्स प्रोजेक्ट युनिटचे संचालक डॉ. महादेव गावस यांनी संकलित केलेल्या 'करिअर कंपास : अ हँडबुक फॉर करिअर, स्कॉलरशिप्स अँड कॉम्पिटेटिव्ह एक्झाम' या ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्त मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी राज्याचे शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, ग्रंथाचे लेखक डॉ. महादेव गावस आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, हा ग्रंथ करिअर मार्गदर्शनातील मैलाचा दगड ठरणार असून तरुणांचे भविष्य घडविण्यासाठी हा ग्रंथ नक्कीच उपयोगी आहे. वास्तव जगातील आव्हानांविरोधात उभे राहण्यासाठीचे बळ विद्यार्थ्यांना नक्कीच करिअर कंपासमधून मिळेल.

पर्वरी : 'करिअर कंपास' या ग्रंथाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर, संचालक भूषण सावईकर, लेखक डॉ. महादेव गावस व मान्यवर

'करिअर कंपास' शिक्षक, विद्यार्थी यांचा साथीदार : डॉ. गावस

विद्यार्थ्यांसाठी करिअर निवड प्रक्रिया सुलभ व्हावी या अनुषंगाने संसाधने तयार करणे हे आमचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट करिअर कंपास या ग्रंथाच्या माध्यमातून साध्य झालेले आहे. करिअर कंपास हा ग्रंथ शिष्यवृत्ती, प्रवेश परीक्षा आणि करिअर मार्गांबद्दल विस्तृत स्वरूपाची माहिती देत असल्यामुळे हा ग्रंथ शिक्षक आणि विद्यार्थी यांचा विश्वासू साथीदार म्हणून काम करेल, अशी प्रतिक्रिया ग्रंथाचे लेखक डॉ. महादेव गावस यांनी दिली.

१२ वी नंतरचा पहिला करिअर मार्गदर्शन ग्रंथ

गोव्यात प्रसिद्ध झालेला हा पहिला असा ग्रंथ आहे, जो १२ वी नंतरच्या करिअर संधीवर प्रकाशझोत टाकतो. या ग्रंथामध्ये विविध क्षेत्रातील २००हून अधिक करिअर पर्याय तपशीलवारपणे स्पष्ट केलेले आहेत. हा ग्रंथ माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये आणि सरकारी ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असेल.

आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षा आणि राष्ट्रीय शिष्यवृत्तींचा समावेश

'करिअर कंपास'मध्ये परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या आंतरराष्ट्रीय प्रवेश परीक्षांचे विस्तृत संकलन केलेले आहे. या ग्रंथामध्ये एसएटी, जीआरई, जीएमएटी, टीओईएफएल, आयईएलटीएस आणि इतर अनेक परीक्षांसाठी पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया आणि अंतिम मुदतीबाबत तपशीलवार विवेचन केलेले आहे. या व्यतिरिक्त या ग्रंथात भारतीय विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या राष्ट्रीय शिष्यवृत्तींची विस्तृत यादी दिलेली आहे.

CHANGE IN NAME

I, **PRAVIN BIKAJI MADGAONKAR** Resident of H no 69, Choppel waddo near church, Sirsaim Bardez Goa has change my name from **PRAVIN BICAJI MADGAUNCAR** to **PRAVIN BIKAJI MADGAONKAR** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **PRAVIN BIKAJI MADGAONKAR.**

NOTICE UNDER ORDER 5 RULE 20(IA)C.P.C by Publication
CJSD/PON/RCS-10/2024/A/2025/2346
IN THE COURT OF SENIOR CIVIL JUDGE, 'A' COURT, AT PONDA
Regular Civil Suit No. 10/2024/A

Shri Bastias Fernandes and Ors ...Plaintiffs

V/s

Shri Blasco Antonio Francisco Xavier Willam Pereira ...Defendant

NOTICE

To,
Defendant
Shri Blasco Antonio Francisco Xavier Willam Pereira,
68 years of age, married,
Residing at Guirdolim, Margao, Goa.

WHEREAS, the abovenamed plaintiff has filed a Suit Under Section 26 of Specific Relief Act, 1963 for Specific Performance and other reliefs (Copies of which may be collected from the Court on working days during working hours).

AND WHEREAS, summons sent to you by Registered Post at the last available address have been returned unserved to this Court.

AND WHEREAS, in the said matter the Advocate for the Plaintiff has filed an application to issue summons to you to this Court for Substituted service by way of publication in the daily newspaper and whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service to publish in daily Newspaper.

YOU ARE THEREFORE, hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material question relating to the suit, or who shall be accompanied by some person able to answer all such question, on the **17th day of June, 2025 at 10.00 a.m.** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day your reply on Temporary Injunction and a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support or your defence or claim for set-off or counter claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day mentioned the suit will be heard and determined in your absence.

GIVEN under my hand and the seal of the Court on this 8th day of the month of April of the year 2025.

SEAL Sd/- (**Jude T. Sequeira**)
Ad-hoc Senior Civil Judge.
'A' Court, Ponda

हरमल : हरमल पंचक्रोशी हायस्कूलच्या दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल प्राप्त बॅच सोबत मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर व शिक्षक वर्ग.

हरमल पंचक्रोशी हायस्कूलचा दहावीचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १० : हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या हायस्कूल विभागाचा दहावीचा बोर्ड परीक्षा निकाल १०० टक्के लागला असून, पालकांत समाधान व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम राखल्याने यशवंत विद्यार्थ्यांचे सर्व थरातून अभिनंदन केले जात आहे.

या विद्यालयातून यंदाच्या परीक्षेस ११६ विद्यार्थी बसले होते, त्यातील ७२ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत, ४० प्रथम श्रेणीत व ४ विद्यार्थी द्वितीय वर्गात उत्तीर्ण झाले. या विद्यालयात प्रथम दिशा तांडेल ९३ टक्के , द्वितीय दीक्षा तांडेल ९१ टक्के व अलिशा पालयेकर ९० टक्के गुण मिळवून तिसरी आली. प्रथम आलेल्या दिशा ही गणित,विज्ञान,समाजशास्त्र व कला विषयात सर्वाधिक गुण तर अलीशा (इंग्रजी), गौरवी गडेकर (हिंदी) व भूमिका केरकर (मराठी) आस्था साटेलकर (गणित २), दीक्षा तांडेल (फाईन आर्ट द्वितीय)भूमिका केरकर,अपेक्षा ठाकूर (लोजिस्टिक)हनुमंत नाईक (शारीरिक विद्या) विषयात सर्वाधिक गुण मिळवले. यावेळी मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर सोबत अध्यापक वर्ग तसेच हायस्कूलच्या यशाबद्दल चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर, पालक शिक्षक संघाचे पदाधिकारी आदींनी अभिनंदन केले.

वाघुर्मेत पथदीपांचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. १० : वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायत क्षेत्रातील खेडे वाड्यावर उभारलेल्या पथदीपांचे मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्यास गोविंद गावडेसह सरपंचा शोभा पेरणी, उपसरपंच बाबू गावडे, स्थानिक पंच सदस्य नवनाथ वेलकासकर, स्वाती पालकर, अक्षय नाईक तसेच बरेच ग्रामस्थ उपस्थित होते.

स्थानिक पंचसदस्य नवनाथ वेलकासकर व माजी पंच मोहन खेडेकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे खेडे वाड्यावर एकूण ३३ वीज खांब बसविण्यात आले आहेत.

यावेळी गावडे म्हणाले की प्रियोळ मतदारसंघातील वीज, पाणी व रस्ते या मूलभूत गरजांना प्राधान्य देत मी कटाक्षाने त्यात लक्ष घातलेले आहे. शिवाय प्रत्येक पंचायतीचे पंचसदस्य, कार्यकर्ते तसेच खात्याचे प्रत्येक अभियंते, अधिकारी मोठ्या जबाबदारीने विकासात्मक कार्यात हातभार लावतात. वेरे – वाघुर्मे पंचायत क्षेत्रातील काही भागात पाण्याची समस्या ना हरकत दाखल्यामुळे रखडली आहे. परंतु हा प्रश्न देखील लवकरच सोडविण्यासाठी प्रयत्नरत आहे. विरोधकांच्या भूलथापांना कुणीही बळी न पडता फक्त जनसेवा करूया, असा टोमणाही त्यांनी मारला.

सावईवेरे : खेडे येथे बसविण्यात आलेल्या ३३ वीज खांबांचे उद्घाटन करताना मंत्री गोविंद गावडे, शोभा पेरणी, बाबू गावडे व इतर.

भाजप सरकारकडून अनेक घोटाळे : पाटकर

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. १० : भाजप सरकारने अनेक घोटाळे केले आहेत आणि त्यामुळे गोव्यातील लोक खूप त्रास सहन करत असल्याचा दावा गोवा काँग्रेस अध्यक्ष अमित पाटकर यांनी केला .शिवोली काँग्रेस ब्लॉक कमिटीची बैठक कपिल कोरगावकर यांच्या तारची भाट शिवोली येथील निवासस्थानी झाली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पाटेकर यांनी हे वक्तव्य केले.

शिवोलीच्या विविध समस्यांवर त्यांनी प्रकाश टाकला ज्या दिवसेंदिवस त्रस्त आहेत आणि लोक भाजप सरकारला कंटाळले आहेत. त्यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुका जिंकण्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी हातात हात घालून काम करावे असे आवाहन केले.

शिवोली : काँग्रेस बैठकीत सहभागी काँग्रेस नेते.

नंदिनी कपिल कोरगावकर यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.

व्यासपीठावर काँग्रेसचे गोवा डेस्क प्रभारी श्री माणिकराव ठाकरे, गोवा प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री अमित पाटकर, उत्तर गोवा जिल्हा अध्यक्ष श्री वीरेंद्र शिरोडकर, सचिव प्रणव परब, सेवा दल अध्यक्ष राजन घाटे, माजी. मंत्री चंद्रकांत चोडणकर, शिवोली प्रभारी प्रदीप देसाई, ब्लॉक अध्यक्ष पार्वती नागवेकर, समाज सेवक कपिल कोरगावर, राजेश कोचरेकर, चंदन मांद्रेकर उपस्थित होते. तसेच रोशन चोडणकर, यश कोचरेकर, व्हिक्टर फर्नांडिस, थॉमस माचेडो, जॉन पायर्स, सुनीता गोलटेकर, जॉन डिसूझा, बलभीम मालवणकर, सोमा टक्कर चोडणकर, सेल्वी फर्नांडिस आदी मान्यवर उपस्थित होते.

एआयसीसी गोवा डेस्क इन्चार्ज माणिकराव ठाकरे यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना पक्षाची रचना सांगितली. तसेच बूथ कमिटी आणि ब्लॉक कमिटी कशा मजबूत करायच्या याबद्दल मार्गदर्शन केले. आगामी निवडणुकीत पक्ष खूप मजबूतपणे पुढे जाईल असेही त्यांनी सांगितले. कामाची प्रगती पाहण्यासाठी ते लवकरच मतदारसंघात भेट देतील असेही त्यांनी सांगितले.

शिवोली प्रभारी प्रदीप देसाई यांनी शिवोली मतदारसंघातील कामाची प्रगती सांगितली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कपिल कोरगावकर आणि पार्वती नागवेकर ह्यांनी खूप कष्ट घेतल्याबद्दल माणिकराव ठाकरे आणि अमित पाटकर ह्यानी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पार्वती नागवेकर यांनी केले तसच कपिल कोरगावकर यांनी आभार प्रदर्शन केले